# आपली किलबिल मराठी शाळा...

- किलबिल शाळा मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया चा अतिशय महत्त्वाचा भाग आहे.
- किलबिल शाळा सुमारे १० वर्षांपूर्वी सुरु झाली. पहिली काही वर्ष सौ वैशाली भिडे या शाळेचं काम पाहत होत्या.
- नंतर सौ. दीपाली जोशी आणि सौ. प्रगती नाडकर्णी यांनी शाळेचं काम यशस्वीरीत्या सांभाळलं. आज आपण मुलांची जे वाढलेली संख्या बघतोय ती या दोघींच्या प्रयत्नांचं फळ आहे.

# किलबिल शाळेचे उद्दिष्ट :

- आपल्या मुलांचे मराठी भाषेशी (मातृभाषेशी) आणि संस्कृतीशी असलेलं नातं घट्ट ठेवणे.
- अर्थातच प्रत्येक पालकांचा मुलांना शाळेत पाठविण्याचा उद्देश वेगळा असू शकतो आणि याची आम्हाला पूर्ण कल्पना आहे.
- परीक्षा अनिवार्य नाहीत, मात्र बी एम एमचे सर्टिफिकिट / गुणवत्ता पत्रक हवे असल्यास परीक्षा देणे गरजेचे आहे.
- मात्र याबरोबरच आपल्याला हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की, परीक्षा, अभ्यासक्रम याचे दडपण न घेता त्यांनी भाषेच्या अभ्यास करण्याचा आनंद घ्यावा, यावर किलबिल शाळेचा भर आहे.
-

# शाळेसंबंधी थोडेसे...

- शाळा सुरू होण्याची तारीख: शुक्रवार, सप्टेंबर १५ २०२३. मागील वर्षीच्या तुमच्या इयत्तेच्या शिक्षकांसोबत तुमचा पहिला वर्ग सुरू होईल.

- शाळेचे ठिकाण: शांती निकेतन, लक्ष्मी-नारायण मंदिर, संध्याकाळी: ६.३० - ८.३०

- मराठी शाळेचे वर्ग सर्वसाधारण online होतात पण महिन्यातून एकदा प्रत्येक इयत्तेचा एकदा प्रत्यक्ष वर्ग होईल. या ठिकाणी शाळा सुरू होण्याची तारीख सर्वांना कळविण्यात येईल. इयत्तानुसार प्रत्यक्ष शाळेच्या वर्गांची उपलब्धता आपण निश्चित करू.

# शाळेसंबंधी थोडेसे...

- शाळा बीएमएम कडून आयोजित होणाऱ्या कार्यक्रमात भाग घेते.

- बीएमएम कडून नॉर्थ अमेरिकेत शालेय मुलांसाठी आयोजित होणाऱ्या सर्व स्पर्धा व त्याबद्दलची माहिती

- बीएमएम तर्फे शाळेच्या मुलांसाठी जे काही वार्षिक उपक्रम राबवले जातात त्यातही आपण सहभाग घेतो

- शाळेतही वर्षभरात वेगवेगळे सण (संक्रांत, गुडीपाडवा, दसरा, दिवाळी, नाताळ) मुलांच्या आणि पालकांच्या सहभागातून साजरे केले जातात. तसाच शाळेचं एक वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केलं जातं – ‘किलबिलाट’

# शाळेतील प्रवेश व अभ्यासक्रम...

- शाळेत प्रवेश घेण्याचे वय: ५ वर्ष व पुढे
- शालेय अभ्यासक्रमाचे वर्ष :
- बालवाडी व पहिली: ६ वर्ष व त्यापुढील वयाची मुले या इयत्तेत बसू शकतात. पुढच्या वर्गात जाण्याआधी मुलं, वर्णमाला, बाराखडी, अंकज्ञान होणे आवश्यक आहे.
- दुसरी व तिसरी इयत्ता: मुलांच्या प्रगतीनुसार १ किंवा २ वर्ष
- चौथी व पाचवी इयत्ता: सर्वसाधारणपणे हा अभ्यासक्रम २ वर्षात पूर्ण केला जातो परंतु मुलांच्या प्रगतीनुसार ही वेळ कमी वा जास्त होऊ शकते.
- शाळेत वर्षाखेरीस गुणांची टक्केवारी सांगितली जाते.

# शाळेतील प्रवेश व अभ्यासक्रम...

- शाळेचा प्रत्यक्ष वर्ग १.५ ते २.०० तासांचा असतो तर online वर्ग १ ते १.५० तासाचा असेल.
- २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाची शाळेची शुल्क / फी $८० असेल. शुल्क भरण्यासाठी लवकरच आम्ही लिंक उपलब्ध करून देऊ.
- शाळेत प्रवेश घेण्यासाठी एमएसबीसी चे २०२४ चे सदस्यत्व असणे आवश्यक आहे.
- फॉर्म भरताना दोन्ही पालकांचे नाव, फोन नंबर देणे अनिवार्य आहे. फॉर्म लवकरच वेबसाइट वर उपलभ होतील.

थोडक्यात मागील वर्षीचा आढावा तुमच्या माहितीसाठी देत आहोत:

- शाळेतील एकूण विद्यार्थी : 61

- मागील वर्षी शाळेची बहुतेक वर्ग online झाले होते तर काही वर्ग आणि शाळेचे काही कार्यक्रम प्रत्यक्ष उपस्थितीत झाले.

- बी एम एम आणि किलबिल मराठी शाळेची वार्षिक परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती होती आणि अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला.

- विद्यार्थ्यांना आणि पालकांना परीक्षेचे निकाल कळविण्यात आले आहेत.

# शाळेत पालकांचा सहभाग व उत्तरदायित्व :

- शिक्षक म्हणून सहभाग घेणे
- सरावपत्रिका तयार करणे
- शिक्षकांना मदत करणे
- शाळेचे कार्यक्रम आयोजित करण्यात सहभागी होणे
- वर्षातील सण व इतर महत्त्वाच्या दिवसांचे आयोजन करणे

# परीक्षा व गुणांकन

- मुलांच्या वर्षभरात २ अनौपचारिक परीक्षा घेतल्या जातील व वर्ष अखेर १ औपचारिक परीक्षा घेतली जाईल.
- बी एम एम च्या परीक्षेची तयारी तपासण्यासाठी २ अनौपचारिक परीक्षा घेतल्या जातात:
- - नोव्हेंबर च्या अखेरीस
- - फेब्रुवारी च्या अखेरीस
- वार्षिक परीक्षा
- - बी एम एम ची ही परीक्षा एप्रिल महिन्याच्या अखेरीस असते किंवा तुम्ही किलबिल शाळेची परीक्षा मे किंवा जून मध्ये देऊ शकता
- - परीक्षा २ भागात घेतली जाते - तोंडी परीक्षा ६० गुण आणि लेखी परीक्षा - ४० गुण

# Reference:

https://marathisocietyofbc.org/marathi-shala-1

Contact Email:  kilbil.marathishala@gmail.com